श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती द्वारा संचालित

# महात्मा फुले कला वाणिज्य व सीतारामजी चोधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड.

## जि.अमरावती.

## वार्षिक अहवाल २०१६-२०१७

सन २०१६-१७ मध्ये वर्गवार प्रवेशित विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे

| अ.क्र | वर्ग | सन २०१६-१७ ची विद्यार्थी संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कला | वाणिज्य | विज्ञान | एकुण |
| १ | प्रथम वर्ष | ३६२ | ३४४ | २७६ | ९८२ |
| २ | द्वितीय वर्ष | १९९ | २६० | २६३ | ७२२ |
| ३ | तृतीय वर्ष | १५२ | २७३ | १८३ | ६०८ |
| ४ | एम.ए.भाग १ (अर्थशास्त्र) | ९० | | | ९० |
| ५ | एम.ए.भाग २ (अर्थशास्त्र) | ४८ | | | ४८ |
| ६ | एम.ए.भाग १ (इंग्रजी) | २९ | | | २९ |
| ७ | एम.ए.भाग २ (इंग्रजी) | १२ | | | १२ |
| ८ | एम.ए.भाग १ (मराठी) | २३ | | | २३ |
| ९ | एम.ए.भाग २ (मराठी) | ७ | | | ७ |
| १० | एम.एस्सी भाग १ (रसायनशास्त्र) | | | २० | २० |
| ११ | एम.एस्सी भाग २ (रसायनशास्त्र) | | | १७ | १७ |
| १२ | एम.कॉम. भाग १ (इंग्रजी माध्यम) | | ५० | | ५० |
| १३ | एम.कॉम. भाग २ (इंग्रजी माध्यम) | | २९ | | २९ |
| १४ | एम.ए.भाग १ (राज्यशासत्र) | ४५ | | | ४५ |
| १५ | एम.ए.भाग २ (राज्यशासत्र) | १९ | | | १९ |
| १६ | एम.एस्सी भाग १ (संगणकशास्त्र) | | | १७ | १७ |
| १७ | एम.एस्सी भाग २ (संगणकशास्त्र) | | | १० | १० |
| | एकूण | ९८६ | ९५६ | ७८६ | २७२८ |

शिष्यवृत्ती व सवलती - सन २०१६-१७ मध्ये विद्यार्थ्यांना मिळालेल्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती व सवलती धारक विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | शिष्यवृत्ती / सवलतीचे नाव | सन २०१६-१७ ची विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | भारत सरकार शिष्यवृत्ती | २१५३ |
| २. | अल्पसंख्याक शिष्यवृत्ती | ५२ |
| ३. | विद्यार्थी कल्याण निधी (अमरावती विद्यापीठ) | ० |
| ४. | अपंग शिष्यवृत्ती | ० |
| ५. | गुणवत्ता शिष्यवृत्ती | ०१ |
| ६. | फ्री शिप | ३८ |
| ७. | इबीसी. | ४४ |
| ८. | पी.टी.सी/एसटीसी. | १ |
| | एकुण | २२८९ |

Scanned by CamScanner

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी : सन २०१६-१७ मध्ये पुर्णकालीन शिक्षक २८, कंत्राटी पध्दत ११, तासीकेप्रमाणे पदवी व पदव्युत्तर विभाग ९८, असे एकुण १३७ शिक्षक व ३९ शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत होते.

**ग्रंथालय विभाग :** या महाविद्यालयाचे ग्रंथालय अभ्यासक्रम व इतर ग्रंथानी समृध्द असुन दरवर्षी या मध्ये अद्यावत ग्रंथाची भर पडत आहे. व ते समृध्द होत आहे.ग्रंथालयात प्रमुख विषयावरिल मासीके, नियत - कालीके विकत घेण्यात येतात व प्राध्यापक, विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिल्या जातात. ग्रंथालयात ३१ मार्च २०१६ रोजी रु. ४४,५९,८७८/- किमतीची एकुण ३३५५४ पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध होती. त्यानंतर १ एप्रील २०१६ ते ३१ मार्च २०१७ मध्ये रु. ३१०८०५/- ची एकुण ६४६ पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत. ३१ मार्च २०१७ ला एकुण रु. ४७,७०,६८३ /- किमतीची एकुण पुस्तके ३४२०० ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

तसेच ३१ मार्च २०१६ पर्यंत मासीके व नियतकालीकांची संख्या एकुण ४३२ रु. १,४०,४८० ची आहेत. १ एप्रील २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत रु. २०३८५ /- किमतींची एकुण २८ मासीके व नियतकालीके खरेदी करण्यात आली असुन ३१ मार्च २०१७ पर्यंत ग्रंथालयात रु.१८०८६५/- - किमतीची एकुण ४२६ मासीके व नियतकालीके उपलब्ध आहेत.

**खेळ व क्रिडा विभाग :** शैक्षणिक सत्र २०१६-१७ मध्ये शारिरिक शिक्षण विभागाने सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अंतर्गत आयोजीत आंतर महाविद्यालयीन खेळ व स्पर्धामध्ये पुढिलप्रमाणे सहभाग नोंदवला. बॅडमींटन , व्हॉलीबॉल, क्रिकेट, कबड्डी, खो-खो, क्रासकंट्री ,बाक्सींग, वेटलीप्टींग, पावरलीप्टींग, मैदानी स्पर्धा तायकांडो इ. सर्व खेळ व स्पर्धा मध्ये महाविद्यालयीन खेळांडुनी अतिशय चांगल्या प्रकारे प्रदर्शन घडवुन आणले. पुढिल खेळाडुचा राष्ट्रीयस्तर व राज्यस्तरीय व सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या चमुमध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी प्राप्त झाली. कोमलसींग बु.बघेल, बी.ए.भाग ३ हयाने मंगरुळ (कर्नाटका) येथे आयोजीत अखिल भारतीय क्रासकंटी चमुमध्ये सं.गा.बा.अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. करिता त्याचा कलर कोट देवून सन्मान करण्यात आला. कु. प्रणाली ग.सुंदरकर,बी.ए.भाग १ हीने पंजाब विद्यापीठ चंदीगढ येथे आयोजीत अखिल भारतीय वेटलीप्टींग व पावरलिप्टींग या स्पर्धत सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. करिता तीचा विद्यापीठाने कलरकोट देवून सत्कार केला. नईम सलीम शेख, बी.एस्सी.भाग २ हयाने सुध्दा पंजाब विद्यापीठ,चंदीगढ येथे आयोजीत अखिल भारतीय वेटलीप्टींग या स्पर्धत सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले.तीचा सुध्दा विद्यापीठाने कलरकोट देवुन सत्कार केला.

ज्याप्रमाणे विद्यापीठ स्तरावर प्राविण्य प्राप्त केले त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी पुढिलप्रमाणे यश प्राप्त केले. कृणाल भा. लेकुरवाळे हयाने आंतरमहाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धत कास्यपदक प्राप्त केले. कु.पुजा मा.देशमुख हीने आंतरमहाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धत रौप्य पदक प्राप्त केले. सुशील एस.पाटील हयाने आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा ४०० मी. धावणे स्पर्धत कास्यपदक प्राप्त केले. प्रणय जी सुंदरकर हयाने आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा २० की. मी. चालणे स्पर्धत सुवर्ण पदक प्राप्त केले.कु.वैशाली अ.भोंडे हीने पटना (बिहार) येथे आयोजीत वरिष्ठ राष्ट्रीय स्तर कबड्डी स्पर्धत प्रतिनिधीत्व केले. कु. स्नेहल बा.वानखडे हीने नागभीड (चंद्रपुर) येथे आयोजीत वरिष्ठ राज्य स्तर कबड्डी स्पर्धत प्रतिनिधीत्व केले. कु.भावना प्र.बहुरुपी हीने सुध्दा नागभीड (चंद्रपुर) येथे आयोजीत वरिष्ठ राज्य स्तर कबड्डी स्पर्धत प्रतिनिधीत्व केले. या सर्व खेळाडुचे महाविद्यालयाने टॅकसुट,शुज व स्मृतीचिन्हे देवुन सत्कार केला.

Scanned by CamScanner

संचालक शारिरिक शिक्षण विभाग श्री व्हि.एन.तेलमोरे हंयाची २०१६-१७ करिता सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ क्रॉसकंट्री चमु निवड समिती अध्यक्ष म्हणून नेमणुक केली. तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ क्रॉसकंट्री चमु व्यवस्थापक म्हणुन मंगरुळ (कर्नाटका) येथे यशस्वीपणे कार्य केले

तसेच शारिरिक शिक्षण विभागाने २०१६-१७ या सत्रात विविध प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले. यामध्ये बॉक्सींग, कराटे ,उन्हाळी प्रशिक्षण शिबिर, जागतीक योग दिवस, जागतीक खेळ दिवस व त्यानिमीत्त विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे करिता ५ कि.मी. चालणे व धावणे स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या.

**राष्ट्रीय सेवा योजना:** महाविद्यालयामध्ये २०० विद्यार्थ्यांचे (१०० मुले/१०० मुली)रासेयो पथक कार्यरत आहे. सन २०१६ वर्षाच्या शेवटच्या टप्यात NAM FOUNDATION अंतर्गत water cup योजने अंतर्गत मा.नाना पाटेकर व मा. अमीर खान या चित्रपट नटाच्या मार्गदर्शनात रा.से.यो. ने सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये इंसब्री व चांदस वाठोडा येथे नदीचे खोलीकरण व शेततळेचे खोदकाम केले. यात महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.डी.व्ही.अतकरे , रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक वर्ग व रा.से.यो. स्वंयसेवकांनी सहभाग घेवुन श्रमदान केले. दिनांक ०१/०७/२०१६ रोजी वनमहोत्सव उपक्रमांतर्गत शासनाचे आदेशान्वये वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न झाला या मध्ये महाविद्यालय परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. या कार्यक्रमात मा.जगन्नाथभाउजी वानखडे व मा. नरेशचंद्रजी ठाकरे माजी कार्यकारीणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांच्या हस्ते वृक्षाची लागवड करण्यात आली. दिनांक ०९/०३/२०१६ ला महाविद्यालयात महाविद्यालय व श्रीनाथ ब्लडबँक नागपुर यांच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजीत करण्यात आले होते. दिनांक १४/८/२०१६ ला याद करो कुर्बाणी या कार्यक्रमाअंतर्गत कँडलमार्च चे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील रासेयोचे दोन विद्यार्थी यांना बांबुपासून राखी व इतर सामग्री बनविण्याचे प्रशिक्षणाकरिता चिखलदरा येथे पाठविण्यात आले होते. दिनांक १४/१०/२०१६ ते २०/१०/२०१६ दरम्यान दत्तकग्राम खडका येथे रा.से.यो. चे सात दिवसीय निवासी विशेष शिबिर घेण्यात आले. दिनांक १५/११/२०१६ ते ३०/११/२०१६ दरम्यान रा.से.यो. च्या वतीने स्वच्छता पंधरवडा राबविण्यात आला. दिनांक २५/११/२०१६ रोजी शासनाचे आदेशान्वये मा. तहसीलदार व महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.डी.व्ही.अतकरे यांच्या मार्गदर्शनात रा.से.यो.स्वंयसेवक व सर्व महाविद्यालयीन कर्मचारी यांच्यासह मतदाता जनजागरण रैली चे आयोजन करण्यात आले.दि. २६/११/२०१६ला रासेयो च्या वतीने संविधान दिवस साजरा करण्यात आला. दिं.१/१२/२०१६ ला एडस दिनच्या माध्यमातुन जनजागृती निर्माण करण्याचे कार्यक्रम घेण्यात आले. दिं. १७/१/२०१७ ते १९/१/२०१७ दरम्यान रासेयोचे दोन स्वंयसेवक सातवी भारतीय छात्र संसद पुणे येथे सहभागी होण्याकरिता पाठविण्यात आले.दिं. ९/१/२०१७ ते १६/१/२०१७ दरम्यान जिल्हा स्तरीय रासेयो विशेष शिबिराकारिता सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अंतर्गत संत गाडगे बाबाचे जन्मगाव शेंडगाव येथे दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच दिनांक १८/३/२०१७ रोजी Red Ribbon Club अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये HIV विषयक माहिती देण्यात आली.

**राष्ट्रीय छात्र सेना :** शैक्षणिक सत्र २०१६-१७ मध्ये एनसीसी विभागामध्ये एकुण ५० छात्र प्रवेशित होते. ८ महाराष्ट्र बटालीयन एनसीसी अमरावती अंतर्गत घेण्यात आलेल्या सर्व प्रशिक्षण शिबिरामध्ये सर्व छात्र सहभागी झाले होते. नवी दिल्ली येथे झालेल्या थलसेना शिबिराकरिता कॅडेड प्रफुल्ल परकोट यांची निवड झालेली होती. कोल्हापुर येथे झालेल्या ट्रॅकींग कॅम्पकरिता अभिषेक झारे व प्रविण दोडके यांची निवड झालेली होती. महाविद्यालयाचे लेप्टनंट डॉ.सी.डी.पाखरे यांची औरंगाबाद येथील पुर्व प्रजासत्ताक दिन परेड

Scanned by CamScanner

करिता निवड करण्यात आली होती. पथकातील कॅडेड दिपक कुशवाह, मनिष केने, रोशन बारमासे, गौरव भुसारी यांची सेनादलात निवड करण्यात आली. पथकातील सर्व कॅडेटसनी वृक्षारोपन, रक्तदान शिबिर, पल्स पोलीओ शिबिर, स्वच्छता अभियान, मतदार जनजागृती अभियान, रस्ता सुरक्षा सप्ताह इत्यादी मध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतेलेला होता. ८ महाराष्ट्र बटालीयन एनसीसी अमरावतीचे कमान अधिकारी अनुपकुमार सुभेदार, मेजर आर.एन.यादव यांनी युनीटला भेट देवुन गौरव केला. आंतरराष्ट्रीय योग दिनासाठी एन.सी.सी. विभागाने उत्कृष्ठ आयोजन करुन पथकाने शिबिर घेतले.

**सांस्कृतिक कार्यक्रम :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने आपल्या संस्थे अंतर्गत 'शिवोत्सव' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षि करण्यात येते .शिवोत्सव २०१६ च्या क गटाची जबाबदारी धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर यांचेकडे संस्थेच्या वतीने देण्यात आली होती. परंतु काही कारणास्तव स्पर्धा अमरावतीच्या रुरल महाविद्यालयाकडे वर्ग करण्यात आला व प्रथम फेरी अमरावती येथे संपन्न झाली. या महाविद्यालयातुन लोकनृत्य, लोकगीत, वादविवाद या स्पर्धामध्ये विद्यार्थी कलावंतानी सहभाग नोंदवला. लोकनृत्य या कलाप्रकारात द्वितीय तसेच लोकगीत या प्रकारातही प्रथम फेरीत द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ही स्पर्धा ८ डीसेंबर २०१६ रोजी संपन्न झाली.

दुसरी व अंतीम फेरी दिनांक २५ डीसेंबर २०१६ रोजी घेण्यात आली.यात या महाविद्यालयाच्या लोकगीत चमुने उत्कृष्ठ प्रदर्शन करित प्रथम क्रमांक पटविला व पारितोषिक प्राप्त केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत स्व. तात्या साहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली जि.बुलढाणा येथे दि: २७ सप्टेबंर २०१६ ते ३० सप्टेबंर २०१६ या कालावधीत युवा महोत्सव आयोजीत करण्यात आला होता. युवा महोत्सव २०१६ साठी या महाविद्यालयातील एकुण २६ कलावंत विद्यार्थ्याची चमु सहभागी झाली होती. यामध्ये लोकनृत्य, लोकगीत,वादविवाद,वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी, क्ले-मॉडेलिंग, स्कीट, माईम या सांस्कृतिक कलाप्रकारात महाविद्यालयाच्या चमुने सहभाग नोंदविला. स्कीट व माईम या कलाप्रकारासाठी यशश्री काशिकर व वृशाली चौधरी यांची विशेष प्रशंषा करण्यात आली. झी वाहीणीच्या झी युवा चॅनलने विद्यार्थ्याची मुलाखत घेवुन ते चित्रिकरण वाहिणीवर प्रसारित केले.

महाविद्यालयात डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ११८ व्या जयंती उत्सवा निमीत्य आयोजीत करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक चमुने लोकगीत व लोकनृत्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन व सादरीकरण करण्यात आले. सांस्कृतिक समितीच्या कलावंतानी स्वागत गीत व इतर समयोचीत गीते सादर केली.

Scanned by CamScanner

विद्यापीठ परिक्षा निकाल :

| अ.क्र | वर्ग | सन २०१६-१७ च्या परिक्षेचा निकाल | | |
|---|---|---|---|---|
| | | परिक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | निकालाची टक्केवारी |
| १. | प्रथम वर्ष कला | ३१८ | ३३ | १०.३८ |
| २. | द्वितीय वर्ष कला | १८७ | ३१ | १६.५८ |
| ३. | तृतीय वर्ष कला | १४७ | ६१ | ४१.५० |
| ४. | प्रथम वर्ष वाणिज्य (मराठी माध्यम) | ३४० | १३९ | ४०.८८ |
| ५. | द्वितीय वर्ष वाणिज्य (मराठी माध्यम) | २५९ | १०४ | ४०.१५ |
| ६. | तृतीय वर्ष वाणिज्य (मराठी माध्यम) | २७२ | १६२ | ५९.६५ |
| ७ | प्रथम वर्ष वाणिज्य (इंग्रजी माध्यम) | १३० | ९३ | ७१.५४ |
| ८ | द्वितीय वर्ष वाणिज्य (इंग्रजी माध्यम) | ११६ | ७० | ६०.३४ |
| ९ | तृतीय वर्ष वाणिज्य (इंग्रजी माध्यम) | १२६ | ९४ | ७४.६० |
| १० | प्रथम वर्ष विज्ञान सेमी.१ | २७५ | १५४ | ५६.०० |
| ११ | प्रथम वर्ष विज्ञान सेमी. २ | २६५ | १८८ | ७०.९४ |
| १२ | द्वितीय वर्ष विज्ञान सेमी. ३ | २६३ | ११६ | ४४.११ |
| १३ | द्वितीय वर्ष विज्ञान सेमी. ४ | २५८ | १२९ | ५०.०० |
| १४ | तृतीय वर्ष विज्ञान सेमी.५ | १८३ | १०३ | ५६.२८ |
| १५ | तृतीय वर्ष विज्ञान सेमी. ६ | १८१ | १३६ | ७५.१४ |
| १६ | एम.ए.भाग १ अर्थशास्त्र | ८४ | ३२ | ३८.१० |
| १७ | एम.ए.भाग २ अर्थशास्त्र | ४७ | २७ | ५७.४५ |
| १८ | एम.ए.भाग १ मराठी | २२ | ७ | ३१.८२ |
| १९ | एम.ए.भाग २ मराठी | ७ | २ | २८.५७ |
| २० | एम.ए.भाग १ इंग्रजी | २५ | ३ | १२.०० |
| २१ | एम.ए.भाग २ इंग्रजी | १२ | १ | ८.३३ |
| २२ | एम.ए.भाग १ राज्यशास्त्र | ३५ | १४ | ४०.०० |
| २३ | एम.ए.भाग २ राज्यशास्त्र | १७ | १२ | ७०.५९ |
| २४ | एम.कॉम भाग १ इंग्रजी सेमी १ | ४९ | १३ | २६.५३ |
| २५ | एम.कॉम भाग १ इंग्रजी सेमी २ | ४३ | १० | २३.२६ |
| २६ | एम.कॉम भाग २ इंग्रजी सेमी ३ | २८ | ४ | १४.२९ |
| २७ | एम.कॉम भाग २ इंग्रजी सेमी ४ | २५ | २३ | ९२.०० |
| २८ | एम.एस्सी.भाग १ रसायनशास्त्र सेमी.१ | २० | १३ | ६५.०० |
| २९ | एम.एस्सी.भाग १ रसायनशास्त्र सेमी.२ | २० | ४ | २०.०० |
| ३० | एम.एस्सी.भाग २ रसायनशास्त्र सेमी.३ | १७ | १३ | ७६.४७ |
| ३१ | एम.एस्सी.भाग २ रसायनशास्त्र सेमी.४ | १७ | १० | ५८.८२ |
| ३२ | एम.एस्सी.भाग १ संगणकशास्त्र सेमी.१ | १७ | १० | ५८.८२ |
| ३३ | एम.एस्सी.भाग १ संगणकशास्त्र सेमी.२ | १६ | ४ | २५.०० |
| ३४ | एम.एस्सी.भाग २ संगणकशास्त्र सेमी. ३ | १० | ६ | ६०.०० |
| ३५ | एम.एस्सी.भाग २ संगणकशास्त्र सेमी. ४ | १० | ८ | ८०.०० |

Scanned by CamScanner

82

**मान्यवरांच्या भेटी :** सन २०१६-१७ मध्ये महात्मा फुले व्याख्यानमाला अंतर्गत श्री निलेश जगताप, पुणे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. स्व.माजी प्राचार्य पी.डी.चौधरी स्मृतीव्याख्यानमाला अंतर्गत मा.श्री.दिलीप सोळंके, चंद्रपुर. यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. तसेच स्व. सीतारामजी चौधरी स्मृती व्याख्यानमाला अंतर्गत प्रा. श्री यशवंत गोसावी, पुणे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. तसेच महाविद्यालयात संपन्न झालेल्या स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबिरास मा.श्री आशिष बिजबल तहसीलदार, यांनी महाविद्यालयाला भेट दिली. तसेच श्री गोरखदिवे , ठाणेदार वरुड, डॉ.ए.एस.शालीग्राम, विभागप्रमुख एनएसएसईटीआय, अमहमदनगर, श्री राम वाघ, संचालक, आकार फाउंडेशन, नागपुर यांनी महाविद्यालयास भेटी दिल्या. डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख यांच्या ११८ व्या जयंती निमित्त व्यक्तीमत्व विकास या विषयावर मा.श्री सचिन बुरघाटे Director ASPIRE,Akola यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. तसेच राष्ट्र निर्मीती मध्ये युवकांचे योगदान या विषयावर मा.प्रा.प्रशांत ठाकरे पुणे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. महाविद्यालयातील विविध कार्यक्रमाला मा.अॅड अरुणभाऊ शेळके, माजी अध्यक्ष,श्री शि.शि.संस्था, मा.श्री महादेवराव भुईभार, मा.डॉ.सुरेश ठाकरे,माजी उपाध्यक्ष,श्री.शि.शि.संस्था, मा.श्री.ह.बा.ठाकरे माजी कोषाध्यक्ष,श्री शि.शि. संस्था, मा.अॅड.एम.के.नाना देशमुख, मा.जगन्नाथभाऊजी वानखडे , मा.श्री नरेशचंद्रजी ठाकरे,मा.अॅड गजाननराव पुंडकर, माजी कार्यकारीणी सदस्य, श्री शि.शि.संस्था तसेच श्री शि.शि.संस्थेचे माजी सचिव मा. वि.गो.भांबुरकर यांनी महाविद्यालयाला भेटी दिलेल्या आहेत. तसेच वरुड शहरातील व परिसरातील मान्यवरांनी या महाविद्यालयाला भेटी दिलेल्या आहेत.

(डॉ.यु.ई.चौधरी)
कार्य.प्राचार्य/कार्य.सचिव
महाविद्यालय विकास समिती
महात्मा फुले कला वाणिज्य व सीतारामजी
चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड.

Scanned by CamScanner